ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष २७ | पुणे, बुधवार, ६ जानेवारी, १९७१ | अंक १

कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

## किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप




### खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्ट्यांमुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि;** उद्योग भवन, टिळक रोड, पुणे २

## पुणे-मिरज ब्रॉडगेज वाहतूक

### १० एप्रिल रोजी प्रारंभ : गाड्यांत आणि गतीत क्रमशः वाढ

पुणे-मिरज रेल्वे लाईनवरील शेवटची मीटर गेज आगगाडी ९ एप्रिल रोजी प्रवास करील.

१० एप्रिल रोजी, नव्या ब्रॉडगेज मार्गावरून सेफ्टी ऑफिसरची स्पेशल गाडी सर्वप्रथम जाईल. त्या मागोमाग रिकामे डबे जोडलेली मालगाडी जाईल. त्यानंतर उतारूंची पहिली आगगाडी जाईल.

पहिल्या वर्षी सर्व आगगाड्या मंद गतीने चालतील. पुणे-मिरज अंतर तोडावयास उतारूंच्या पॅसेंजर गाड्यांना १३ तास आणि एक्सप्रेस गाड्यांना १०·५ तास लागतील. प्रत्येक दोन महिन्यांनी हा वेळ एका तासाने कमी केला जाईल. प्रारंभी दोन पॅसेंजर आणि दोन एक्सप्रेस आगगाड्यांची ये-जा होईल. त्यांपैकी एक एक्सप्रेस कोल्हापूर ते थेट मुंबईपर्यंत जाईल. तिला 'महालक्ष्मी एक्सप्रेस' असे म्हटले जाईल. दुसऱ्या एक्सप्रेसचे नाव 'महाराष्ट्र एक्सप्रेस' असे राहील.

पुणे-बंगलोर एक्सप्रेसची जागा मिरज-बंगलोर एक्सप्रेस घेईल. ती मिरज ते बंगलोर 'कर्नाटक एक्सप्रेस' ह्या नावाने ये-जा करील.


मिरज-पुणे ब्रॉडगेज वाहतूक सुरू झाल्यावर १०-१२ दिवसांनी कोल्हापूर-मिरज ब्रॉडगेज वाहतूकही सुरू होईल. प्रथम सहा आगगाड्या चालू होतील. त्यांना २ तास, ३० मिनिटे लागतील. एका महिन्याने हा वेळ १ तास, १५ मिनिटांवर आणण्यात येईल. दोन एक्सप्रेस आगगाड्या कोल्हापूर ते थेट मुंबईपर्यंत जाऊ लागतील; एक सकाळी आणि एक संध्याकाळी. हे अंतर तोडण्यास ९ तास, ३० मिनिटे पुरतील.

---

### संत्र्यांच्या बागायतदारांची अडचण

विदर्भातील रसाळ संत्री सर्व भारतात प्रसिद्ध आहेत. त्यांची लागवड सुमारे १०० वर्षांपूर्वी होऊ लागली. सध्या नागपूर जिल्ह्यात सुमारे २४ हजार एकरांत आणि वर्धा-अमरावती भागात सुमारे २० हजार एकरांत संत्र्यांच्या बागा आहेत. हिवाळ्यातील मोसम आणि उन्हाळ्यातील मोसम जमेस धरता सुमारे ५ कोटी रुपये किमतीचे उत्पादन दर साल होत असते. ह्या बागायतीला दर्जेदार रोपांचा पुरवठा करण्यात आला तर १० वर्षांच्या अवधीत १० कोटी रुपयांचे उत्पादन होऊ शकेल. पण अलीकडे चांगली रोपे मिळेनाशी झाली आहेत. त्यामुळे संत्र्यांच्या झाडाचे आयुष्य ४० वर्षे ते ६० वर्षे होते, ते आता १० वर्षांइतके खाली आले आहे. ह्यावर उपाय म्हणून कटोल येथे रोपे तयार करण्याचे एक केंद्र उघडण्यात येणार आहे.

---


**GADRE BROTHERS**
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone : 318 @Sangli. Gram : 'SEWA Madhavnagar

**सरदारगृह**

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ६ जानेवारी, १९७१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## अमेरिकेत गेलेल्या हिंदी तरुणांची दैन्यावस्था

अविकसित देशातील बेकारीचे कारण म्हणून अर्थव्यवस्थेचा अपुरा विकास पुढे करण्यात येतो. प्रगत देशातील बेकारीची मीमांसा अनेक तात्पुरत्या कारणांनी करण्यात येते. ह्याचा अर्थ असा की आर्थिक विकास आणि वाढती बेकारी ह्यांचे मूलभूत संबंध अर्थशास्त्रज्ञांना म्हणावे तितके स्पष्ट समजलेले नाहीत. अमेरिकेसारख्या समृद्ध देशातील बेकारीची मूलभूत कारण-मीमांसा त्यामुळेच नीटशी झालेली नाही. दरम्यान, अमेरिकन अर्थव्यवस्थेवर आलेल्या मंदीच्या सावलीत अनेक कुशल शास्त्रज्ञ, इंजिनिअर्स, कॉस्ट अकौंटंटस् खुरटत चालले आहेत. अमेरिकेने अवकाश संशोधनावरील आपला खर्च कमी केला आहे. त्याचा परिणाम म्हणून सुमारे ४५ हजार हुषार व कसबी तंत्रज्ञांना बेकारीची चव घ्यावी लागत आहे आणि त्यांच्या संख्येत रोजी भरच पडत चालली आहे. सध्याच अमेरिकेतील बेकारांचा आकडा ४६ लाखांच्या घरात पोचलेला असून त्यात व्हिएटनाममधून परत येणाऱ्या लष्करातील जवानांची भर पडत आहे. असे सुमारे ८० हजार जवान परतणार असून उपलब्ध रोजगारावर त्यांना अग्रहक्क देण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत भारतामधून नशीब काढण्यासाठी अमेरिकेला गेलेल्या हिंदी तरुणांची स्थिती करुणास्पद झाली असल्यास नवल नाही. अमेरिकन सरकारच्या आकड्यांप्रमाणे जून, १९७० अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात भारतामधून १०,८१० नागरिक अमेरिकेत आले. हे नागरिक साधेसुधे नव्हते; तर विशेष प्रकारच्या कौशल्याबद्दल त्यांच्याजवळ प्रमाणपत्रे होती.

अमेरिकेत आलेल्या हिंदी नागरिकांत एंजिनिअर्स, शास्त्रज्ञ, इत्यादींसारखे तज्ज्ञ असून नोकरी न मिळाल्यामुळे त्यांना फार हलाखीच्या परिस्थितीत कसेतरी दिवस काढावे लागत आहेत. काहीजणांनी कारकुनी नोकऱ्या पत्करल्या आहेत, तर काही टंकलेखक म्हणून बोटे झिजवीत आहेत. काही लोकांना निरोप्या गड्यांचे कामही स्वीकारावे लागले आहे. आर्थिक अडचणीत सापडल्यामुळे त्यांच्या पुढे दुसरा मार्गच राहिलेला नाही. उच्च शिक्षण घेण्यासाठी अगर पैसा मिळविण्यासाठी अमेरिकेला जाणाऱ्या हिंदी लोकांची संख्या गेली काही वर्षे वाढत चाललेली आहे. बहुतेकांपुढे निश्चित असा कार्यक्रम अगर योगक्षेमाची नीट व्यवस्था नसते. अमेरिकेसारख्या श्रीमंत देशात कसेही काम मिळेल अशा भोळ्या भावाने ते अमेरिकेत गेलेले असतात. तेथे काही न जमल्यामुळे भारतात परत येण्याची त्यांना लाज वाटत असते. ह्यापैकी कित्येक तरुणांनी तर भारतामधील कायमच्या नोकऱ्या सोडून पैशाच्या म्हणजेच बड्या पगाराच्या मोहाने स्वतःच्या देशाला रामराम ठोकलेला असतो. अशा अवघड परिस्थितीतच अमेरिकेतील राहणी फार खर्चाची झालेली आहे. कित्येक विद्यार्थ्यांना त्यामुळे पुढचे शिक्षण पूर्ण करणे अशक्य झालेले आहे. दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाला आता तीन वर्षे लागू लागली आहेत. कारण स्वतः मिळवून अभ्यासक्रम पुरा करावयाचा तर मिळेल ते काम करणे भाग पडत आहे. अर्थातच अभ्यासावर एकचित्त करणे जमेनासे झाले आहे. अमेरिकेवर आलेली मंदी तात्कालिक आहे अशी समजूत करून घेऊन काहीजण दिवस कंठीत आहेत. पण तज्ज्ञांचे मात्र तसे मत नाही.

---

## शेतीच्या यांत्रिकीकरणात येणाऱ्या अडचणी

प्रगत देशांतील शेती सुधारणांची माहिती झाल्यामुळे भारता-मधील शेतकरीही बदलत्या काळाबरोबर राहण्याचा प्रयत्न करीत आहे. सुधारलेल्या शेती-व्यवसायाची एक बाजू म्हणून यांत्रिक अवजारांचा अधिक प्रमाणात वापर करण्याच्या खटपटीत तो आहे. यांत्रिक अवजारांचा उपयोग करून शेती आधुनिक व संपन्न करण्याचे प्रयत्न अनेक सुखवस्तू शेतकरी करीत आहेत. तथापि शेती आधुनिक पायावर उभारण्याचे हे प्रयत्न सहज-सुलभ आहेत असे मात्र नाही. यांत्रिकीकरण आणि आधुनिकीकरण करताना अनेक नवे प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभे राहात आहेत. शेतीच्या उत्पादनाचे आधुनिक तंत्र वापरण्यास त्याने प्रारंभ केला असला तरी त्याबद्दल त्याला पुरेशी माहिती नाही. त्यामुळे शेती सतत फायदे-शीर होण्याची खात्री त्याला वाटत नाही. दुसरी गोष्ट शेतीला लागणाऱ्या यांत्रिक अवजारांची. ही अवजारे सर्वांना पुरतील इतक्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. शिवाय जी काही मिळतात ती हिंदमधील शेतावर वापरण्यास योग्य असतीलच ह्याची खात्री देता येत नाही. भारत सरकारचे माजी शेती मंत्री आणि शेती कमिशनचे अध्यक्ष श्री. सी. सुब्रह्मण्यम् ह्यांनी ह्याविषयी केलेला अभ्यास बराच बोधप्रद ठरण्यासारखा आहे. कसेल त्याची जमीन ह्या धोरणाने सरकार पावले टाकीत आहे. पण ह्या धोरणामुळे जमिनीचे तुकडे पडून आधुनिक यंत्रसामग्री वापरणे कठीण

होण्याची शक्यता आहे. जमिनीच्या मालकीवर कमाल मर्यादा घालण्याचे सरकारने ठरविले आहे. ह्या धोरणापासून मागे फिरणे आता शक्य होणार नाही. म्हणजे ह्या प्रश्नाचे स्वरूप आता पूर्णतया सामाजिक झालेले आहे.

ठराविक मर्यादेपलीकडील शेतजमीन मालकांकडून काढून घेऊन ती भूमिहीन शेतकऱ्यांना अग्रहक्काने वाटून द्यावी लागणार आहे. पण असे करताना शेती करणाऱ्याला परवडणार नाही इतकी लहान जमीन त्याला देऊन उपयोगी नाही. नाहीतर अशी शेती त्याच्या शिरावर एक भारच घातल्यासारखे होईल. बारमाही पाणीपुरवठा असणारी तीन एकर जमीन असेल तर ती आर्थिक दृष्ट्या आतबट्ट्याची होत नाही असा अनुभव आहे. मात्र तिची मशागत काळजीपूर्वक करण्यात आली पाहिजे. छोट्या शेतजमिनीवर यांत्रिक अवजारे वापरता येत नाहीत असे नाही. जपानमध्ये छोट्या शेतीचे यांत्रिकीकरण यशस्वी रीत्या करण्यात आलेले आहे. त्या देशात शेतजमिनीचा किमान तुकडा ०·८ हेक्टर इतका लहान आहे आणि जास्तीत जास्त मोठा तुकडा २ हेक्टर इतका आहे. तरीही तेथे शेतीचे यांत्रिकीकरण समाधानकारक रीतीने करण्यात आलेले आहे. भारतामधील शेतकऱ्यांत छोट्या जमीनमालकांची संख्या अधिक आहे. एकूण शेतकऱ्यांपैकी ७० टक्के शेतकरी छोट्या शेतकऱ्यांत मोडतात. परंतु त्यांना उपयोगी पडतील अशा प्रकारची छोटी शेतीची अवजारे उपलब्ध नाहीत. ह्या बाबतीत यांत्रिक नांगरांचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. सध्या बाजारात जे ट्रॅक्टर्स मिळू शकतात त्यांचा छोट्या शेतकऱ्याला काही उपयोग होण्यासारखा नसतो. ते वापरावयाचे झाल्यास किमान १५ एकरापेक्षा अधिक सलग शेतजमिनीची आवश्यकता असते. हे ट्रॅक्टर्स वापरणाऱ्या बहुतेक शेतकऱ्यांची जमीन १० ते १५ एकरांच्या दरम्यान असते. तरीही ते त्यांचा वापर करीत असतात. कारण, आधुनिक शेतीत ट्रॅक्टरने आपले स्थान निश्चित केले आहे. शिवाय ह्या अवजाराचा उपयोग वाहतुकीसाठी आणि एंजिनाच्या साह्याने नलिका विहिरीमधील पाणी उपासण्यासाठीही करता येतो. तज्ज्ञांच्या मताने भारतामधील छोट्या शेतीसाठी १० ते १५ अश्वशक्तीच्या छोट्या ट्रॅक्टरची जरुरी आहे.

## साखरेच्या राखीव साठ्यांचा प्रश्न

साखरेबाबतचे धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल. साखरेच्या राखीव साठ्यांचा प्रश्न दोन प्रकारे हाताळण्यात येत आहे. एक म्हणजे साखरेचा वापर करण्याची प्रवृत्ती लोकांत वाढीस लागावी म्हणून उपाययोजना करण्यात येत आहे. त्यामुळे राखीव साठा कमी राहील. दुसरे म्हणजे गुदामांची सोय करण्यात येत आहे. राज्य सरकारांना नागरी विभागात साखरेच्या वाटपाचे प्रमाण वाढविण्यास सांगण्यात आले आहे. पूर्वी ते प्रमाण कमी होते. त्याचप्रमाणे साखर वाटपासाठी राज्यसरकारांकडे १९६८-६९ साली लेव्ही साखर १७·३२ लाख टन देण्यात आली होती तर १९६९-७० मध्ये हेच प्रमाण २८·१८ लाख टन होते. खुल्या बाजारात विकण्यासाठी सुट्या केलेल्या साखरेचे प्रमाणही १९६८-६९ साली ९·८३ लाख टन होते ते १९६९-७० साली १४·३७ लाख टनांपर्यंत नेण्यात आले आहे. राज्याराज्यात असलेल्या खुल्या साखरेच्या वाहतुकीवरील बंदी उठविण्यात आली आहे. १९६८ च्या आंतरराष्ट्रीय साखर करारानुसार जास्तीत जास्त साखर निर्यात करण्याचे प्रयत्न चालू आहे. केंद्रीय व राज्य गुदाम महामंडळाकडे राखीव साठा ठेवण्याची व्यवस्था होईल असे साखर कारखान्यांना कळविण्यात आले आहे. चालू वर्षात साखर कारखान्यांना पुरेसे आर्थिक साहाय्य देण्याबाबतही रिझर्व्ह बँकेला विनंती करण्यात आली आहे.

## "अर्था"चे ३७ व्या वर्षात पदार्पण

[ कै. प्रोफेसर वा. गो. काळे ह्यांनी १९३५ मध्ये ज्या राष्ट्रहिताच्या उद्देशाने "अर्था"ची स्थापना केली, तो उद्देश कसा सफल होत आहे, ह्यासंबंधी डॉ. चिंतामणराव देशमुख ह्यांचा अभिप्राय आम्ही येथे देत आहो. ]

**'राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी'**

"सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्याच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणे त्याला विशेष कठीण असते. त्या समजून घेण्यात त्यांना साहाय्य देणे हे आपल्या "अर्था"चे कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. "अर्थ" ही कामगिरी उत्कृष्ट रीतीने बजावीत आहे असे मी **स्वानुभवावरून, दृढ विश्वासाने** सांगू शकतो. योग्य ते लोकसाहाय्य मिळून "अर्था"ची ही कामगिरी अव्याहत प्रभावीपणाने चालो."

**चिं. द्वा. देशमुख**

( पूर्वीचे रिझर्व्ह बँक गव्हर्नर व भारत सरकारचे निवृत्त अर्थमंत्री )

## महाराष्ट्र बँकेचा विकास आणि प्रगती

**"कै. प्रो. वा. गो. काळे ह्या पुण्यपुरुषाच्या दूरदृष्टीचेच फलित होय"**

"शिक्षण, सांस्कृतिक कार्य आणि सामाजिक व राजकीय चळवळी यांचे माहेरघर म्हणून पुण्यपत्तनाची महती फार पुरातन. १९३० सालानंतर आर्थिक मंदी आली, ती झंझावाती वेगाने. अशा वेळी गरज होती ती आर्थिक विकास करून बेकारी हटविण्याची. याच उद्देशाने महाराष्ट्राचे आर्थिक भवितव्य उज्ज्वल करण्याचा विचार सतत समोर ठेवून दिनांक ८ फेब्रुवारी, १९३६ रोजी पुण्यपत्तनात या बँकेची स्थापना करण्यात आली. कै. प्रा. वा. गो. काळे यांच्यासारखे अर्थशास्त्रज्ञ या बँकेच्या प्रगतीची धुरा वाहात होते. बँकेची आजची सुस्थिती ही या पुण्यपुरुषाच्या दूरदृष्टीचेच फलित होय"

**चिं. वि. जोग**

( "बँक ऑफ महाराष्ट्र"चे कस्टोडिअन )

### अधिक कर लादण्यास आता जागा नाही

कोणत्याही सुसंघटित राज्यसंस्थेला कर बसवून ते वसूल करण्याची जबाबदारी स्वीकारावीच लागते. सरकार ह्या संघटनेचा योगक्षेम त्याशिवाय चालणे शक्यच होत नाही. पण हे कर कशासाठी, समाजाच्या कोणत्या थरावर आणि किती प्रमाणात बसवावे ह्यासंबंधी चांगल्या तज्ज्ञ अर्थशास्त्रज्ञांतही मतभेद दिसून येतात. अर्थात, अर्थशास्त्रज्ञांच्या सामाजिक दृष्टिकोणात त्यांच्या एतद्-विषयक विचाराचे धागेदोरे गुंतलेले असतात. समाजातील आर्थिक विषमतेची बोच कमी करण्यासाठी करपद्धतीचा उपयोग करण्याचा विचार आता स्थिरावला आहे. कर देणे हे कोणालाच आवडत नाही. असे असले तरी करांचा खरा जाच ठराविक उत्पन्न असणाऱ्या मध्यमवर्गातील म्हणजे मुख्यत: पगार अगर वेतन मिळवणाऱ्या लोकांना होतो हे मान्य करावे लागते. दिल्ली येथे करविषयक कायद्यांविषयी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. ऑल इंडिआ टॅक्स ॲडव्होकेटस् असोसिएशन ह्या संघटनेने पुरस्कारलेल्या ह्या परिसंवादाचे उद्घाटन सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती श्री. हेगडे ह्यांनी केले. ह्या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की गेल्या काही वर्षांत मध्यम वर्गातील लोकांचे खरे उत्पन्न एक-सारखे घटत चालले आहे. ठराविक पगार अगर वेतन मिळविणारा समाजातील हा गट एका प्रकारच्या कैचीत सापडला आहे. एका बाजूने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर वाढत चाललेले आहेत आणि दुसऱ्या बाजूने किंमतीही चढत चालल्या आहेत. कैचीच्या ह्या बाजू एकमेकांशी संलग्न अशा आहेत. दोन्ही बाजूंतील अंतर कातरीच्या पात्यांप्रमाणे कमी होत चालले आहे.

विशेषत: गेल्या दहा वर्षांत करांची कमान सारखी चढत आहे आणि ह्या आर्थिक घटनेचे सर्वांत मोठे बळी मोजक्या उत्पन्नावर गुजराण करणारे मध्यम वर्गातील लोक झाले आहेत. प्रतिवर्षी येणाऱ्या अंदाजपत्रकाकडे हे लोक चिंताग्रस्त होऊन बघत असतात. त्यांना त्याची धडकीच भरलेली आहे. अलीकडील काही वर्षांत एकही वर्ष असे दाखविता येणार नाही की ज्यात कराचा भार कमी करण्यात आला आहे आणि करातून सूट देण्याच्या बाबी कमी करण्यात आलेल्या नाहीत. राज्यसंस्था भविष्यकालातील सुखासाठी चालू पिढीला त्याग करण्यास सांगेल अशी लक्षणे दिसत आहेत. असा त्याग काही मर्यादेपर्यंत करावा लागला तर ते गैर आहे असे म्हणता येणार नाही. परंतु त्यालाही काही मर्यादा असते. पोटावरचा पट्टा किती आवळावा ह्यालाही काही मर्यादा असावी लागते. भविष्यकाल अनिश्चित स्वरूपाचा असताना कोणत्याही पिढीला सर्वस्वाचा त्याग करावयास सांगणे योग्य होणार नाही. शिवाय दुसरे असे, की गेल्या २० वर्षांच्या अवधीत समाजातील बऱ्याच लोकांनी केलेल्या त्यागामुळे देशाची अर्थ व्यवस्था बळकट झाली आहे किंवा नाही ह्याविषयीही वाद आहे. हा सर्व त्याग फुकट गेला आहे असाही एक प्रवाद ऐकू येत आहे. जबरदस्त कर आकारल्यामुळे ते चुकविण्याची वृत्ती बळावली आहे आणि काळा पैसा मिळविण्याला प्रोत्साहन मिळाले आहे. त्यातच प्राप्तिकर अधिकाऱ्यांपैकी काहीजण करपात्र व्यक्तींना फार छळतात. त्यामुळे करपात्र व्यक्ती अगर संस्था कर चुकविण्याचे अयोग्य मार्ग अनुसरण्यास प्रवृत्त होतात असा अनुभव आहे.

---

### उत्तर भारतात विजेच्या टंचाईचा धोका

आधुनिक औद्योगिक जीवनात औद्योगिक शक्तीला असाधारण महत्त्व आहे. कारखान्यांच्या चाकांना गती देणाऱ्या शक्तीत विजेची शक्ती विशेष स्वागतार्ह मानली जाते. भारता-सारख्या अप्रगत देशाची भरभराट होण्यास शेतीबरोबरच उद्योग-धंद्यांची वाढ होणे अगत्याचे आहे. परंतु अखेर सर्व गोष्टी निसर्गावर अवलंबून आहेत. ह्याची प्रचीती उत्तर भारतासमोर उभ्या ठाकलेल्या संभाव्य विजेच्या टंचाईमुळे पुन्हा येत आहे. भाक्रा धरणाच्या पाणलोटाच्या क्षेत्रात अपुरा पाऊस पडल्यामुळे तेथे उत्पादन होणाऱ्या विजेत बरीच घट झाली आहे परिणामी पंजाब, हरिआना, राजस्थान, हिमाचल प्रदेश, जम्मू व काश्मीर इत्यादी राज्यांच्या विकासाला धोका पोचण्याचा संभव निर्माण झाला आहे. त्यातही पंजाबला विजेच्या टंचाईचा धक्का अधिक जाणवणार आहे. एकीकडे हा धोका संभवत असतानाच पंजाबची विजेची भूक मात्र वाढली आहे. अर्थातच, उत्पन्न होणाऱ्या विजेचे वाटप राज्याला अधिक मिळावे म्हणून प्रयत्न करण्यात येत आहेत. भाक्रा येथे उत्पन्न होणाऱ्या विजेपैकी मोठा हिस्सा नांगल येथील खताच्या कारखान्याला मिळतो. रासायनिक खताच्या निर्मितीचा हा कारखाना फार मोठा वाटा उचलित आहे. त्याला जर विजेच्या टंचाईला तोंड द्यावे लागले तर खतांच्या निर्मितीत घट होऊन त्याचा परिणाम खतांच्या वापरावर आधारलेल्या सकस शेतीवर होणे अपरिहार्य दिसते. एकूण काय, निसर्गावर मात करण्याचे प्रयत्न आधुनिक तंत्रज्ञांनाही नीट शेवटास नेता येतात, असे दिसत नाही.

---

### बिर्लांचा कारखाना म्हैसूर राज्यात जाणार

मध्य प्रदेशातील उज्जैन शहराजवळ बिर्लाग्राम येथे ग्वाल्हेर रेयॉन सिल्क मिल्स ह्या नावाचा बिर्लांचा कारखाना आहे. ह्या कारखान्यामधील एंजिनिअरिंगचा विभाग हलवून तो आता म्हैसूर राज्यातील हरिहर ह्या ठिकाणी उभारण्यात येणार आहे. ह्याच ठिकाणी म्हणजे बिर्लाग्राम येथे कॉस्टिक सोडा तयार करण्याचा एक कारखाना उभारण्याचाही संकल्प होता परंतु आता तो सोडून देण्यात आला आहे. एंजिनिअरिंगचा विभाग हलविण्याची कारणे म्हणून महागडी वीज आणि रेल्वेच्या वाहतुकीचे जबर दर ह्यांच्याकडे बोट दाखविण्यात येत आहे. त्याशिवाय एंजिनिअरिंग विभागाचा माल तेथून बाहेर पाठविण्यास अडचणींना तोंड द्यावे लागते. कारखान्याच्या दृष्टीने उज्जैन हे ठिकाण बरेच गैरसोयीचे असल्याने तो हलविण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

---

### विमाने जबरीने पळविणारांविरुद्ध कायदेशीर कारवाई

विमानांच्या आंतरराष्ट्रीय वाहतुकीतील नेहमीच्या धोक्याशिवाय अलीकडे एक नवा धोका उत्पन्न झालेला आहे. प्रवास करण्याच्या मिषाने विमानात जागा मिळवून वमानिकाला शस्त्राचा धाक दाखवायचा, आणि विमान सक्तीने वाटेल तिथे उतरविण्यास भाग पाडावयाचे असे प्रकार होऊ लागले आहेत. ह्या प्रकारांना आळा घालण्यासाठी काय करावे ह्याचा विचार करण्यासाठी दि हेग येथे एक परिषद भरविण्यात आली होती. परिषदेत भाग घेण्यासाठी ५० देशांचे प्रतिनिधी आले होते. १५ दिवस चाललेल्या ह्या परिषदेत एक आंतरराष्ट्रीय करारनामा तयार करण्यात आला. त्यावर सर्व देशांच्या प्रतिनिधींनी सह्या केल्या. विमाने पळवून नेणारांवर खटले भरण्याचे अगर त्यांना अटक करून दुसऱ्या देशांना पाठविण्याचे बंधन आता ह्या देशांनी पतकरले आहे. ह्याबाबतीत मुख्य अडचण गुन्ह्याच्या क्षेत्राची व अधिकाराची होती. आता ज्या देशात विमान पळविणारे लोक पकडले जातील तेथे त्यांना अटक करण्यात येईल आणि त्यांच्यावर खटले भरण्याचा हक्क ज्या देशातून विमान सुटले त्या देशाला आणि ज्या देशाला ते जावयाचे होते त्या देशाला असेल. त्याचप्रमाणे ज्या देशात विमानाची नोंदणी झालेली असेल त्या देशालाही खटला भरता येईल. काही वेळा एखाद्या देशाचे राजकीय दूत दुसऱ्या देशात आसरा मागतात. त्यांच्यासमोर प्रवासाचा बिकट प्रश्न असतो. परंतु राजकीय हेतूने म्हणजे आसरा मिळविण्यासाठी सुद्धा विमाने पळविण्याचा मार्ग योग्य ठरत नाही, असा अभिप्राय परिषदेत व्यक्त करण्यात आला.

---

### महर्षींच्या पाठोपाठ भारतीय फॅशन्सची निर्गत

'तराजूच्या पाठोपाठ निशाण' असा इंग्रजांच्या साम्राज्यवाढीचा इतिहास आहे. 'महर्षींच्या पाठोपाठ भारतीय फॅशन्सची निर्गत' असे आपल्या निर्गतीबद्दल म्हणता येईल.

महर्षी अमेरिकेत गेले. त्यांच्या भोवती तरुण-तरुणी गोळा झाल्या. हातात सतार घेऊन अनवाणी नाचू लागल्या, कुडता पेहरू लागल्या. तीन-चार वर्षांपूर्वी अशा प्रकारे अमेरिकेच्या तरुण पिढीने आपला पोशाक बदलण्यास प्रारंभ केला. पुढे राजा कोट लोकप्रिय झाला. भारतीय चुडीदारासारख्या लिओटार्डसूचा खप वाढला. दुपट्टासमान स्कार्फ वापरण्यात येऊ लागले. हळूहळू भारतीय कापड आणि तयार कपडे ह्यांचा खप वाढू लागला. आता भारतात तयार होणारे कपडे परदेशी बाजारात दरसाल ३० कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ मिळवून देऊ लागले आहेत. भारतीय कापडाचे, भारतीय तज्ज्ञाने निर्माण केलेल्या फॅशन्सप्रमाणे बनविलेले कपडे अमेरिकेतील फॅशन शोमध्ये प्रदर्शित करण्यात येत आहेत. मिसेस एलेनॉर मॅकमिल्टन् ह्यांच्या नेतृत्वाखाली त्यासाठी एक संघटनाच स्थापन झाली आहे. ह्या बाई नुकत्याच भारतात येऊन गेल्या. श्री. मार्तंड सिंग हे अमेरिकेत खपणाऱ्या कपड्याच्या फॅशन्सचे कल्पक आहेत. कापडाचे वजन, त्याचा पोत, शरीरावर ते कसे आकर्षक दिसू शकेल, कोणता रंग कोणत्या वातावरणास पोषक असतो, ह्या सर्वांचा अभ्यास करून फॅशन्स निर्माण करावयाच्या असतात, असे श्री. सिंग म्हणतात.

---

### आंतरराष्ट्रीय योग विद्यापीठाची सूचना

योग विद्येविषयी आस्था असणाऱ्यांची एक आंतरराष्ट्रीय परिषद दिल्ली येथे भरविण्यात आली होती. परिषद ५ दिवसपर्यंत चालली होती. अखेरच्या दिवशीच्या खुल्या अधिवेशनात आंतरराष्ट्रीय योग विद्यापीठ स्थापन करण्याची सूचना एका ठरावाद्वारे करण्यात आली. परिषदेसाठी जगातील अनेक देशांचे १,००० प्रतिनिधी आले होते. त्यात ब्रिटन, अमेरिका, हॉलंड, जपान, डेन्मार्क, कॅनडा, स्वित्झरलंड, ह्या शिवाय भारताचेही प्रतिनिधी होते. अध्यक्ष म्हणून आचार्य ख्रिस्टॉफर हिल्स ह्या ब्रिटिश योग तज्ज्ञाची निवड झाली. आचार्य भारतामधील योग विद्येचा अभ्यास करण्यासाठी एक दौरा काढणार आहेत. त्यांच्या बरोबर ३० परदेशी-प्रतिनिधीही फिरणार आहेत.

---

### टेलिव्हिजन सेटस्ची आयात नाही

युरोप-अमेरिकेतील प्रगत देशांत घरोघरी टेलिव्हिजन सेटस असतात. जनमानसापर्यंत पोचण्याचे हे अत्यंत प्रभावी साधन असून भारतासारख्या देशाला तर त्याचा शैक्षणिक उपयोग फार महत्त्वाचा आहे. असे असले तरी हिंदमध्ये दूरचित्रवाणीच्या प्रक्षेपणाची केंद्रे अगर टेलिव्हिजन सेट्स फारसे नाहीत. तत्संबंधीचा उद्योगधंदाही बाल्यावस्थेत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन ब्रिटनमधील एका मोठ्या वृत्तपत्र मालकाने भारताने काळी-पांढरी चित्रे दाखविणारे टेलिव्हिजन सेट्स आयात करावे अशी सूचना मध्यवर्ती सरकारच्या संबंधित खात्यास केली होती. असे सेट्स आयात करून ते लोकांना भाड्याने द्यावे अशी सूचना त्याने केली होती. परंतु देशाच्या टेलिव्हिजनच्या उद्योगधंद्याला त्यामुळे आडकाठी उत्पन्न होईल म्हणून भारत सरकारने सूचना फेटाळली आहे.

---

### वन्यपशूंच्या संरक्षकांना बंदुकांची देणगी

आसाममधील काझीरंगा हा अरण्यप्रदेश वन्यपशूंना अभय देणारा म्हणून राखून ठेवण्यात आला आहे. वन्यपशूंची बेसुमार हत्या होत असल्यामुळे ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील प्रगत देश ह्या बाबतीत भारताच्या मानाने अधिक दक्ष आहेत. वन्यपशूंच्या रक्षणाविषयी केलेले कायदे तेथे चांगल्या रीतीने पाळले जातात. भारतात मात्र बेकायदा शिकारी कायद्याला दाद देत नाहीत. काझीरंगा अभयारण्याचे संरक्षण करणाऱ्यांना मदत म्हणून पश्चिम जर्मनीतील एक वन्य प्राणिरक्षक संघटनेने २४बंदुकांची भेट पाठविली आहे. त्यांचा उपयोग करून आसाममधील वन्यपशूंची बेकायदा हत्या थांबविली जावी असा देणगीचा हेतू आहे.

## तंत्र विज्ञानाचा अमेरिकेच्या जीवनावरील परिणाम

आधुनिक तंत्रविज्ञान आणि त्याचा रोजच्या व्यावहारिक जीवनात उपयोग करून घेण्याची प्रवृत्ती ह्या बाबतीत अमेरिका आघाडीवर आहे. गणिक यंत्राचा वापर करून विवाह जुळविण्याची तऱ्हाही तेथील लोकांना चमत्कारिक वाटत नाही. हरघडी यंत्रांचा वापर करणाऱ्या ह्या देशातील लोकांच्या जीवनावर आधुनिक तंत्रज्ञानाचा काय परिणाम झाला आहे अगर होत आहे हे अजमावण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठाने अलीकडे एक पाहणी केली. ह्या पाहणीचे काम २२ सार्वजनिक व औद्योगिक संघटनांतील १०० तज्ज्ञांनी केलेले आहे. पाहणीचा खर्च इंटरनॅशनल बिझिनेस मशीन्स कॉर्पोरेशन ह्या संघटनेने केला. ह्या कामासाठी संघटनेने ५० लाख डॉलर्सची तरतूद केली होती. तंत्रविज्ञानाचा व्यक्तीवर होणारा परिणाम, त्याचप्रमाणे सामाजिक मूल्ये आणि राजकीय व आर्थिक संघटना ह्यांवर होणारे परिणामही पाहणीच्या कक्षेत घेतलेले होते. ह्या सर्व खटाटोपाचे काही प्राथमिक निष्कर्ष हाती आले आहेत. त्यावरून असे दिसते की यंत्रांच्या वापरामुळे जीवन अधिक सुखकर झाले आहे ह्याबद्दल अमेरिकन लोकांचे एकमत आहे. परंतु ह्याचबरोबर त्यांना असेही वाटत आहे की यंत्रांच्या वापरावर वाजवीपेक्षा अधिक अवलंबून राहण्याची वृत्ती वाढलेली आहे. टेलिव्हिजन आणि गणकयंत्रं ह्यांसारख्या शोधांनी जीवन अधिक सुखद झाले आहे. अवकाश संशोधनामुळे मात्र सुखात भर पडलेली नाही. एकंदरीने, तांत्रिक शोधामुळे समाजाच्या जीवनाला लाभ झालेला असला तरी खुद्द माणूस मात्र गणकयंत्रांत माहितीसाठी घालावयाच्या सरंध्र कार्डासारखा झाला आहे!

---

## पोलंडमधील दंग्यांची आर्थिक पार्श्वभूमी

कम्युनिस्ट राष्ट्रगटातील पोलंड ह्या देशात खाद्यपदार्थांच्या किमती भडकल्यामुळे अलीकडेच झालेले दंगे आर्थिक नियोजनाच्या विचारसरणीला धक्के देणारे म्हटले पाहिजेत. आर्थिक नियोजनाच्या मूळ कल्पनेत मूलभूत गरजांना प्राधान्य देण्याचा हेतू असतो. पोलंडमधील गोमुल्का सरकारने ह्या हेतूलाच फाटा दिलेला दिसतो. कारण, तेथे टेलिव्हिजन सेट्स, रेफ्रिजरेटर्स ह्यांसारख्या चनीच्या वस्तूंच्या किमती खाद्यपदार्थांच्या किमतीशी तुलना करता फारशा वाढल्या नाही. उलट धान्य, मांस, मासे, अंडी, ह्यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती मात्र एकदम ३०टक्क्यांनी वाढल्या. अर्थातच लोकांचा असंतोष भडकून त्याचा स्फोट झाला. ह्या आपत्तीला नैसर्गिक कारणांचीही अनुकूलता लाभली. गेली एक-दोन वर्षे पोलंडमधील अन्नधान्याचे उत्पादन अनुकूल हवापाण्याच्या अभावी घसरले होते. पोलंडचा रशिआ, हंगेरी, इत्यादी देशांशी असणारा व्यापार अनुकूल तफावतीचा आहे. त्या देशांतून अन्नधान्याची आयात करणे पोलंडला शक्य आहे. परंतु ही आयात फार मोठ्या प्रमाणावर करावी लागली तर मात्र फ्रान्स व कॅनडा सारख्या देशांकडून गव्हाची आयात करावी लागेल आणि त्यासाठी अर्थातच परदेशीय चलनात किंमत मोजावी लागेल. परंतु पश्चिमेकडील देशांशी पोलंडचा व्यापार फारसा नाही. अर्थातच परदेशीय चलनाची प्राप्तीही बेताची आहे. औद्योगिक विकासावर अधिक जोर देण्यात आल्यामुळे पोलंडचा शेती-विकास म्हणावा तसा झाला नाही. म्हणजे, रशिअन आर्थिक नियोजनात ज्या चुका झाल्या त्याच पोलंडनेही केल्या असे दिसते.

---

## हुशार विद्यार्थ्यांना खास शिक्षण द्या

पंजाबचे गव्हर्नर श्री. डी. सी. पावटे ह्यांनी म्हैसूर विद्यापीठाच्या ५१ व्या पदवीदान समारंभ प्रसंगी भाषण करताना हुशार विद्यार्थ्यांना खास शिक्षण देण्याच्या रशिआच्या पद्धतीचे अनुकरण करण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले की विद्यापीठांनी गणित आणि पदार्थविज्ञान शास्त्रांत विशेष गती असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना तज्ज्ञ शिक्षकांच्या साह्याने खास शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. आधुनिक शास्त्रीय विकासाच्या गरजा लक्षात घेऊन विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमांत मूलगामी स्वरूपाचे बदल करण्याची तयारी दाखविली पाहिजे. शास्त्रीय विषयातील अद्ययावत् विचारांची ओळख व्हावी म्हणून विद्यार्थ्यांनी एका तरी परदेशी भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

---

## शवासनाचा हृदयरोगावर उपाय

मुंबई येथील हृदयविकार तज्ज्ञ डॉ. दाते ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, योगासनामधील शवासनाच्या साह्याने हृदयविकार बरा होऊ शकतो. ह्या विकारासंबंधी बोलताना ते म्हणाले की १९०५ च्या सुमारास अमेरिकेत होणाऱ्या मृत्यूपैकी २५ टक्के मृत्यू ह्या विकारामुळे होत असत. १९५५ मध्ये हृद्रोगाने होणाऱ्या मृत्यूंची टक्केवारी ५५ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. भारतातही ह्या विकाराने दगावणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत चालले आहे. अतिशय धूम्रपान आणि वनस्पती तुपाचा खाण्यात वापर ह्यांमुळे हा विकार उद्भवणे अपरिहार्य ठरते. त्याशिवाय वेळीअवेळी अन्नग्रहण आणि संतापी स्वभाव आणि अती श्रम, हीही त्याची कारणे आहेत.

---

## सदोष ट्रॅक्टर्सची दिल्लीमध्ये होळी

४८९ आर. ए.–०१ ( पूर्व जर्मनी ) ट्रॅक्टर्सचे मालक जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात दिल्लीवर मोर्चा नेऊन राष्ट्रपती भवन, पंतप्रधानांचे निवासस्थान किंवा पूर्व जर्मनीच्या व्यापारी प्रतिनिधीची कचेरी, ह्यांचेसमोर एका नादुरुस्त ट्रॅक्टरची होळी पेटविणार आहेत. हे ट्रॅक्टरवाले वाटेत जालंदर, लुधियाना आणि पतियाळा येथे निदर्शने करणार आहेत, ह्या शेतकऱ्यांना सदोष ट्रॅक्टरांबद्दल नुकसानभरपाई नको आहे. वेगळ्या, चांगल्या बनावटीचे ट्रॅक्टर हवे आहेत.

**लिबियामधील परदेशी बँका**—लिबियाच्या क्रांतिवादी कौन्सिलने त्या देशात व्यवहार करणाऱ्या सर्व विदेशी बँकांचे राष्ट्रीयीकरण २२ डिसेंबर, १९७० रोजी जाहीर केले. परदेशी भागदारकांना त्यांच्या भागांच्या पोटी भरपाई मिळेल.

**दरसाल ५०,००० सैनिकांची निवृत्ती**—दरसाल ५०,००० एवढे सैनिक लष्करातून निवृत्त होतील. त्यांपैकी अधिकारी वगळून बाकी सर्व ३५ वर्षांच्या पेक्षा कमी वयाचे असतील. त्यांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नाकडे राष्ट्रीय प्रश्न ह्या दृष्टीने राज्य सरकारांनी पाहावे, असे संरक्षणमंत्र्यांनी आवाहन केले आहे.

**विद्यापीठावर सेल्स टॅक्सची आकारणी**—विद्यार्थ्यांना प्रवेश पत्रिका विकल्यामुळे आणि रद्दी विकल्यामुळे चंदिगड विद्यापीठास 'व्यापारी' ठरवून त्यावर सेल्स टॅक्स लादण्यात आला आहे. ह्यावर विद्यापीठाने हायकोर्टाकडे दाद मागितली आहे. हायकोर्टाने करवसुली स्थगित ठेवली आहे.

**तिकिटांचे प्रदर्शन**—पोस्ट आणि तार खात्याने दिल्ली येथे पोस्टाच्या तिकिटांचे एक प्रदर्शन भरविले आहे. त्यात १८५४ सालापासूनची पोस्टाची तिकिटे मांडण्यात आली आहेत. भूतान, बर्मा, इंडोनेशिया, मलेशिया आणि नेपाळ ह्यांनीही प्रदर्शनात भाग घेतला आहे. प्रदर्शनातील तिकिटांची किंमत एक कोटी रुपये भरेल. प्रदर्शनाच्या एका वेगळ्या भागात विशेष मौल्यवान तिकिटे ठेवलेली असून त्यांचा १० लक्ष रुपयांचा विमा उतरलेला आहे.

**भारताच्या कर्जात ६४८ कोटी रु. ची वाढ**—भारताच्या कर्जात १९६९–७० मध्ये ६४८ कोटी रु. ची भर पडून ते १३,२७५ कोटी रु. झाले. ह्या कर्जाव्यतिरिक्त मध्यवर्ती सरकारची इतरही देणी आहेत, (अल्प बचत, राज्यांचे प्रॉव्हिडंट फंड, पी. एल. ४८० ठेवी, इनकमटॅक्स ॲन्युइटी ठेवी, घसारा व इतर फंडांच्या ठेवी, इ.) त्यांची रकम मार्च, १९७० अखेर ४,४७० कोटी रु. भरली. ह्या देण्यात गेल्या वर्षी ३४७ कोटी रु. ची भर पडली आहे.

**गुलाबाच्या फुलांची निर्गत होणार नाही**—चंदीगड येथील गुलाबाची फुले युरोपकडे पाठविली जातात. ६० ते ९० सें. मी. लांब दांडीच्या फुलांना डझनास ६ रुपये असा भाव स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने देऊ केला; फुलवाल्यांना ९ रुपये दर हवा आहे. परिणाम—निर्गत होणार नाही.

**पदवीधर बुटपॉलिशवाला**—कलकत्ता येथील गजबजलेल्या डलहौसी स्केअरच्या कोपऱ्यावर बुटपॉलिशचा धंदा करणाऱ्या एका पदवीधराभोवती बरेच बघे जमले होते. त्याने "पदवीधर बुटपॉलिशवाला" असा मोठा फलक लावलेला होता. "पूर्वी मी आगगाडीत जिनसा विकत असे त्यापेक्षा हा धंदा अधिक चांगला चालतो. मला दररोज सुमारे दीड रुपया मिळतो. पण तेवढ्यावर संसार चालू शकत नाही" असे तो म्हणतो. १९६३ साली तो बी. कॉम. झाला. त्याच्यावर सहा कुटुंबीयांचा भार आहे.



® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.

## ससून इस्पितळातील ऑर्थोपेडिक वर्कशॉप

### 'सोसायटी ऑफ फ्रेंड्स ऑफ दि ससून हॉस्पिटल्स'चा उपयुक्त उपक्रम

गत वर्षापर्यन्त पुण्यात, ऑर्थोपेडिक आणि शस्त्रक्रियेच्या रुग्णांना उपयुक्त अशी साधने निर्माण करणारे एकमेव वर्कशॉप होते. ते म्हणजे वानवडी येथील. हे वर्कशॉप संरक्षण खात्यातर्फे चालत असल्याने अर्थातच अशी साधने देण्यात मिलिटरीच्या लोकांना प्राधान्य दिले जाई. त्यामुळे पुणे आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांची खूपच अडचण होत असे.

ही गरज पूर्ण करण्यासाठी ससून हॉस्पिटलमध्येच एक वर्कशॉप काढावे अशी फार दिवसांपासून मनात कल्पना होती. पण आर्थिक साहाय्या अभावी ती प्रत्यक्षात उतरू शकली नाही. शतसांवत्सरिक महोत्सव निधीतून रु. १५,००० प्राथमिक खर्चासाठी देणगी म्हणून मिळाले. यामुळेच ही कल्पना मूर्त होऊ शकली.

अशा रीतीने खर्चाचा प्रश्न अर्धाअधिक तर सुटला. कच्चा माल, यंत्रसामग्री इत्यादींचा खर्च कसा भागणार? तेव्हा ससून मित्रमंडळाने ही जबाबदारी स्वखुषीने आपल्याकडे घेतली.

यानंतर डीन, ससून हॉस्पिटल व बी. जे. मेडिकल कॉलेज, यांच्या अध्यक्षतेखालील मंडळाच्या मार्गदर्शनाखाली दि. १ जाने. १९७० पासून वर्कशॉपचे काम चालू झाले. वर्कशॉपमध्ये सध्या, पूर्ण वेळ काम करणारा एक ऑरथोपेडिक टेक्नीशियन, एक फिटर-वेल्डर, एक मोची आणि एक अर्ध वेळ काम करणारा क्लार्क, असे चार जण काम करतात.

पहिल्याच वर्षात पोलिओ, ॲम्प्युटेशन, ह्युमेटॉइड ॲरथ्रायटिस, हार्निया, सेरेब्रल पाल्सी, स्लिप्डडिस्क, अशा विविध कारणांसाठी लागणाऱ्या साधनांची मागणी वर्कशॉप पूर्ण करू शकले.

आजपर्यंत वर्कशॉपने रु. ८,८७० ची २५० साधने २४६ रुग्णांना पुरवली आहेत. त्यात कृत्रिम पाय, कृत्रिम हात, कुबड्या, पट्टे, बूट, बुटांसह कॅलिपर्स, सर्व्हायकल कॉलरी, टेलर्स ब्रेस, स्प्लिंट्स, मेंटा टार्सलबार, इत्यादी १९ प्रकारच्या साधनांचा समावेश आहे. ही उपकरणे ना फायदा, ना तोटा, ह्या तत्त्वानुसार पुरविली जातात.

हे वर्कशॉप अधिक विकसित व्हावे, अधिक कार्यक्षम व्हावे, सर्व प्रकारची साधने त्यात निर्माण व्हावीत ह्यासाठी चांगल्या दर्जाची अधिक यंत्रसामग्री हवी आहे, तसेच काम करणारे तंत्रज्ञ वाढवणें हेही अगत्याचे आहे. ह्या प्रयत्नाला आपण नाही का काही हातभार लावणार?

---

**भागीदाऱ्यांना ऑडिट सक्तीचे असावे**—लिमिटेड कंपन्यांपेक्षा भागीदाऱ्यांच्या रूपाने धंदे करणारांची संख्या खूपच वाढली आहे. अशा फर्म्सच्या आर्थिक व्यवहारांचे सत्य स्वरूप स्पष्ट होण्यासाठी आणि त्यांच्यावरील कराची आकारणी सुयोग्य करण्यासाठी त्यांचेवर ऑडिटची सक्ती करण्यात यावी, असे इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्सनी सुचविले आहे.

## स्वस्तिकचे उत्पादन ५·१७ कोटी रु. वरून ६·२ कोटी रु. वर गेले. पुढील वर्षी आणखी ३३% वाढणार.

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स् लि. ने १९७० मध्ये उत्कृष्ट प्रगती केली आहे. १९६९ मध्ये ५·१७ कोटी रु. चे उत्पादन झाले होते; १९७० मध्ये ६·२ कोटी रु. चे झाले. म्हणजे, उत्पादनात १९% वाढ झाली. १९७१ मध्ये १९७० चे मानाने उत्पादन किमान ३३% अधिक होईल, अशी कंपनीची अपेक्षा आहे.

स्वस्तिकच्या चिंचवड येथील फुटवेअर आणि फोम शाखा सुव्यवस्थित उत्पादन करू लागल्या आहेत. रबर लायनिंग शाखाही विस्तारत आहे. नाशिकच्या 'सिकॉम'च्या साहाय्याने अशा उत्पादनांची वाढती मागणी पुरी करणे आणि निर्गत वाढविणे कंपनीस सहज शक्य होईल. मेसर्स ब्यूफर्ट कं (यु. किं.) शी तांत्रिक सल्लामसलतीबाबतच्या करारास भारत सरकारने १९७० च्या उत्तरार्धात मान्यता दिली. आणि त्याचा फायदा घेऊन कंपनी लाईफ सेव्हिंगची नवी उत्पादने हाती घेत आहे. स्वस्तिकच्या पूर्ण मालकीची उपकंपनी, श्री प्रॉडक्ट्स लि. ही पश्चिम जर्मन आणि अमेरिकन कोलॅबोरेशनने फार्मास्युटिकल रबर जिनसांचे उत्पादन गतीने वाढवीत आहे.

आय. जी. एम. इंडस्ट्रिज प्रा. लि. ही मॉरिशसमधील रबर ग्लोव्हज्च्या उत्पादनासाठी अभिनव उपक्रम प्रगतिपथावर आहे. कारखान्याचे बांधकाम चालू झाले असून ते जून १९७१ अखेर पुरे होईल.




### युरोप-अमेरिकेला खादाडपणामुळे धोका

कोलंबिआ विद्यापीठातील डॉ. चार्ल्स किंग ह्यांनी जगात आहाराच्या दृष्टीने दोन संकटग्रस्त विभाग निर्माण झाल्याचा इषारा दिला आहे. ह्यापैकी एक विभाग युरोप-अमेरिका हा आहे. ह्या भागाबद्दल त्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे, की तेथील लोक आपल्या भोवतालच्या परिस्थितीशी मिळताजुळता असा आहार ठेवीत नाहीत. त्यांच्याभोवती समृद्धीचे वातावरण सदैव पसरलेले असते. तारतम्याने पाहता त्यांना शारीरिक मेहनत करण्याची फारच थोडी गरज असते. तरीसुद्धा जरुरीपेक्षा अधिक उष्णता निर्माण करणारा आहार ते एकसारखा घेत राहतात. त्यामुळे शरीरात मेद उत्पन्न होण्यास व तो तसाच राहण्यास मदत होते. आहारात उत्पन्न झालेल्या ह्या असमतोलामुळे आता अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. तीवर उतारा म्हणून लोकशिक्षणाचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला पाहिजे. आहारविषयक संकटाने ग्रासलेला दुसरा विभाग उष्ण कटिबंधातील देशांचा आहे. त्यातही विकसनशील देश निकस आहाराच्या संकटाने विशेष ग्रासलेले आहेत. ह्यांपैकी बहुतेक देशांनी आहारातील उणिवा नाहीशा करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. परंतु माणसाचा पिंड नीट पोसला जाण्याच्या जरुरीच्या मानाने ह्या बाबतीतील प्रगती फारच मंद आहे. माणसाच्या जीवनात त्याच्या आयुष्यातील पहिली काही वर्षे पोषणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असतात. त्या वेळी जर सकस अन्नाचा पुरवठा झाला नाही तर मुलांच्या प्रकृतीस फार मोठा धोका पोचतो आणि पुढे कितीही चांगला आहार दिला तरी झालेली विकृती सुधारू शकत नाही.

---

### शेतीमधील क्रांतीचे श्रेय कशाला?

इंडिअन इकॉनॉमिक असोसिएशन ह्या संघटनेची ५३ वी वार्षिक परिषद गोहाटी येथे भरली होती. ह्या परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. दातवाला ह्यांनी देशातील हरित क्रांतीविषयी नेहमीपेक्षा निराळे विचार प्रकट केले आहेत. देशांतील जमीनधारणेच्या कायद्यात दुरुस्ती करून शेतीच्या विकासाला चालना मिळेल हा भ्रम आहे. ग्रामीण भागांतील दारिद्र्य त्यामुळे नाहीसे होणार नाही, असा अभिप्राय व्यक्त करून ते पुढे म्हणतात की हरित क्रांतीला आलेले यश जमीनधारणेच्या कायद्यातील दुरुस्त्यांमुळे आलेले नाही. दर एकरी अधिक पीक देणाऱ्या नव्या बी-बियाणांचा शोध हरित क्रांतीला यशदायी ठरलेला आहे. अविकसित देशांतील दारिद्र्य दूर करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे श्रमाची उत्पादकता वाढविणे आणि उत्पादनाची रास्त वाटणी करणे.

### महात्माजींच्या पुतळ्यावरील जकातीचा प्रश्न

बुलढाणा जिल्हा परिषदेने महात्मा गांधींचा पुतळा शिल्पकाराला २५,००० रु. देऊन करून घेतला, पण त्यावरील जकात कोणी भरावी, शिल्पकाराने की जिल्हा परिषदेने, ह्या भांडणात तो पुतळा बाँड वेअरहाउसमध्ये दुर्लक्षित पडून आहे.

**सरकारकडून सर्कसवाल्यांची अपेक्षा**—"सर्कसच्या कलेला सरकार उत्तेजन तर देत नाहीच, पण त्या कलेची उपेक्षा करते. फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या धर्तीवर सर्कस फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना होणे आवश्यक आहे. परदेशी पाठविण्यात येणाऱ्या सांस्कृतिक मंडळात सर्कस संघाचाही समावेश केला जावा" अशी मागणी इंडियन सर्कस फेडरेशनचे उपाध्यक्ष, श्री. के. एस्. मेनन, ह्यांनी केली आहे.

**दक्षिण आफ्रिका फाशी देण्यात अग्रेसर**—ज्या देशासंबंधी आकडे उपलब्ध आहेत, अशा एकूण देशांत फासावर जेवढे चढविले जातात, त्यांपैकी निम्मे दक्षिण आफ्रिकेतील असतात. १९११ पासून १९६८ अखेर दक्षिण आफ्रिकेतील २,३३३ लोकांनी फाशीची शिक्षा भोगली. त्यांपैकी फक्त ८५ श्वेतवर्णीय होते. ह्या २,३३३ पैकी निम्म्यापेक्षा अधिक लोक १९५३ नंतर फासावर गेलेले आहेत. सध्या दरसाल सुमारे १०० लोक त्या देशात फासावर चढविले जातात.

**वेश्यांसाठी गुलाबाच्या फुलांची ओळखचिन्हे**—तैपे (तैवान) येथील वेश्यांना पोलिस खात्याने गुलाबाच्या फुलांच्या चित्रांच्या बॅजेस दिल्या आहेत. वेश्यांकडे जाणाऱ्या गिऱ्हाइकांना कळावे की ह्या गुलाबाला रोगाचे काटेही चिकटलेले असतात आणि त्या धोक्याची त्यांना जाणीव व्हावी, हा ह्या पुष्पचिन्हामागील हेतू आहे.

**रत्ना सरी देवी नटी होणार?** इंडोनेशियाचे भूतपूर्व अध्यक्ष सुकार्नो ह्यांची चवथी पत्नी रत्ना सरी देवी हिला एका चित्रपटात प्रमुख भूमिका देऊ करण्यात आली आहे. चित्रपटाचे नाव "सुवासिक रखेली" असे आहे.

**बस कंडक्टरांचा आणि ड्रायव्हरांचा विक्रम**—मुंबईमधील बस कंडक्टर दररोज सरासरीने १,००० तिकिटे फाडून देतो आणि बसड्रायव्हर २३० किलोमीटर अंतर बस चालवितो; हे दोन्ही जागतिक विक्रम आहेत.


**बँक कचेऱ्यांची संख्या**— १४ राष्ट्रीयीकृत बँकांच्या कचेऱ्यांची संख्या जून, १९६९ मध्ये ४,१३० होती, ती जून, १९७० मध्ये ५,३१८ झाली. कर्मचाऱ्यांची संख्या १,०१,८७४ वरून १,१७,२१७ वर गेली.

**मध्य प्रदेश स्टेट ट्रॅन्सपोर्टचा तोटा**—मध्यप्रदेश स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनला गेल्या तीन वर्षात १·८२ कोटी रु. तोटा झाला. "मोठ्या प्रमाणावर चोऱ्या, बहुसंख्य नोकरवर्गात कर्तव्यतत्परतेचा अभाव आणि अधिकारी वर्गात सहकार्याचा अभाव ह्याचा हा परिणाम आहे" असे संबंधित मंत्र्यांनी सांगितले.

**बाटा कंपनीची परिषद**—बाटा शू कंपनी कलकत्ता येथे १७ जानेवारी रोजी एक परिषद भरविणार आहे. कंपनीच्या उत्पादनाचे वितरक, विक्रेते, ह्यांना विक्रीच्या बाबतीत प्रशिक्षण देणे हा त्याचा उद्देश आहे.

चवदार पिठासाठी

# पिठाच्या चक्क्या



- बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
- मजबूत बांधणी
- अद्यावत् यंत्र योजना
- साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९

उत्पादक –

**भिडे ॲन्ड सन्स, प्रा. लि. सांगली**

महाराष्ट्र राज्य.






सोल सेलींग अेजन्टस्

**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३२ तार : Vijayplow

# नहीं—
## यह कोई
## साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: २७६१०२


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)